**प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली**

# हवामानावर आधारीत कृषि सल्ला (ठाणे व पालघर जिल्हा)

**(०२३५८) २८२३८७**

**अंक ३१/२०१९** | **दिनांक १६/०४/२०१९** | **कालावधी ५ दिवस**


**डॉ. अशोककुमार चव्हाण,**
विभाग प्रमुख,
कृषिविदया विभाग
९४२२३७३३९६

**डॉ. विजय मोरे,**
नोडल ऑफिसर,
कृषिविदया विभाग
९४२२३७४००१

**डॉ. शितल यादव,**
तांत्रिक अधिकारी
कृषिविदया विभाग
८३७९९०११६०


| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक १०/०४/२०१९ ते १६/०४/२०१९) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक १७/०४/२०१९ सकाळी ८:३० पासून २१/०४/२०१९ सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १०/०४ | ११/०४ | १२/०४ | १३/०४ | १४/०४ | १५/०४ | १६/०४ | | १७/०४ | १८/०४ | १९/०४ | २०/०४ | २१/०४ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | - | पाऊस (मिमी) | ० | ० | ० | ० | ० |
| ३२.२ | ३२.२ | ३२.४ | ३२.४ | ३७.४ | ३३.२ | - | कमाल तापमान (अं.से) | ३४ | ३५ | ३६ | ३७ | ३७ |
| २२.४ | २३.४ | २२.६ | २.२ | २३.० | २४.६ | - | किमान तापमान (अं.से) | २७ | २७ | २७ | २७ | २६ |
| ० | ० | ० | ० | ० | ० | - | मेघाच्छादन (ऑक्टा) | १ | ० | ० | ० | ० |
| ८६ | ९० | ७७ | ९१ | ८४ | ८१ | - | सकाळची सापेक्ष आर्द्रता | ७९ | ५९ | ५८ | ५३ | ७१ |
| ६८ | ६४ | ६४ | ४४ | ६० | ५० | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता | ३४ | २३ | २३ | २१ | २१ |
| ३.४ | ३.५ | ३.१ | ३.५ | ४.१ | ४.३ | | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ६ | ५ | ४ | ३ | ४ |
| द. | इ. | इ.उ. | शांत | शांत | आ.द. | - | वाऱ्याची दिशा | नै.प. | नै. | नै.प. | पू. | ई.उ. |

| पाऊस (मिमी) मागील आठवडयातील | पाऊस (मिमी) १/१/२०१८ पासून आजपर्यंत | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा |
|---|---|---|
| ०.० | ०.० | २३५९.६ |

## हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला

**दिनांक १७ ते २१ एप्रिल, २०१९ पर्यंत कमाल व किमान तापमानात वाढ होण्याची शक्यता आहे.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| **उन्हाळी भात** | **फुलोरा अवस्था** | • उन्हाळी भात पिकास नत्राचा तिसरा हप्ता हेक्टरी २० कि. ग्रॅ. नत्र (४३ कि. ग्रॅ. युरिया) पिक फुलोऱ्यात असताना देण्यात यावा तसेच लोंब्या आल्यानंतर दहा दिवसांपर्यंत शेतामध्ये पाण्याची पातळी १० सें. मी. पर्यंत ठेवावी. |
| **आंबा** | **फलधारणा अवस्था (अंडाकृती ते पक्वता अवस्था)** | • आर्द्रतेत होणारी घट व तापमानातील होणाऱ्या वाढीमुळे आंब्याची फळगळ होण्याची शक्यता आहे. फळगळ कमी करण्यासाठी पाण्याच्या उपलब्धतेनुसार आंब्याच्या झाडास १५ दिवसांच्या अंतराने १५० ते २०० लिटर पाणी देण्याची व्यवस्था करावी. आणि झाडाच्या बुंध्याभोवती आच्छादनाचा वापर करावा.<br>• जिल्ह्यातील काही ठिकाणी मोठ्या आकाराची फळे काढणीच्या अवस्थेत असून फळांची काढणी 'नूतन' झेल्याच्या सहाय्याने चौदा आणे (८० ते ८५ टक्के) पक्वतेला देठासह सकाळी १० वाजेपर्यंत किंवा संध्याकाळी ४ नंतर करावीत. उष्णतेमुळे फळांचे तापमान वाढून साक्याचे प्रमाण वाढण्याची शक्यता असल्याने आंब्याची फळे काढल्यानंतर सावलीमध्ये ठेवावीत तसेच आंबा फळांची वाहतूक रात्रीच्या वेळेस करावी. फळे काढणीच्या किमान ८ दिवस अगोदर झाडावर कोणतीही फवारणी करू नये.<br>• आंब्यावरील काढणी पश्चात बुरशीजन्य रोगापासून आंबा फळांचे संरक्षण करण्यासाठी काढणी नंतर लगेचच फळे ५२° सें. तापमानाच्या पाण्यात १० मिनिटे बुडवून काढावीत व नंतर फळे पिकविण्यासाठी ठेवावीत. डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठाने शिफारस केलेल्या कोरोगोटेड फायबर बॉक्समध्ये फळे पकिंग करावीत.<br>• आंबा पिकावर करपा रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे. करपा रोगाच्या नियंत्रणासाठी कार्बेन्डाझीम १२ टक्के + मॅन्कोझेब ६३ टक्के १० ग्रॅम. प्रति १० लिटर पाण्यातून प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. तसेच आंबा फळांचे फळमाशीपासून संरक्षण करण्यासाठी विद्यापीठाने शिफारस केलेले "रक्षक फळमाशी सापळा" प्रती हेक्टरी ४ या प्रमाणात बागेमध्ये झाडाच्या खालील बाजूच्या फांद्यावर लावावेत. फळगळ झालेली आंबा फळे गोळा करून नष्ट करावी व बागेत स्वच्छता ठेवावी.<br>• नवीन लागवड केलेल्या आंबा कलमांना पहिली तीन वर्षे पाणी देण्याची व्यवस्था करावी तसेच जोडाच्या खाली बुंध्यावर येणारी फूट वेळोवेळी काढून टाकावी. उन्हाळ्यात पहिल्या वर्षी आठवडयातून दोन वेळा तर दुसऱ्या वर्षी पंधरा दिवसातून दोन वेळा व तिसऱ्या वर्षी महिन्यातून दोन वेळा प्रत्येक कलमांना ३० लिटर पाणी दयावे<br>• आंबा नवीन लागवडीसाठी निवडलेल्या क्षेत्रातील साफ सफाई करून घ्यावी. एप्रिल - मे महिन्यात १० **x** १० मीटर अंतरावर व घन पध्दतीने लागवडीसाठी ५ **x** ५ मीटर अंतरावर १ **x** १ **x** १ मीटर आकाराचे खड्डे खणून ते चांगली माती आणि तीन ते चार घमेली **चांगले कुजलेले शेणखत** आणि ३ किलो सिंगल सुपर फॉस्फेट या मिश्रणाने भरून तयार ठेवावेत.<br>सूचना : अर्धवट कुजलेले शेणखत वापरल्यास कलमांना वाळवीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असते. |
| **काजू** | **नवीन लागवड** | • काजू नवीन लागवडीसाठी निवडलेल्या क्षेत्रातील साफ सफाई करून घ्यावी. एप्रिल - मे महिन्यात ७ **x** ७ मीटर किंवा ८ **x** ८ मीटर अंतरावर ०.६ **x** ०.६ **x** ०.६ मीटर आकाराचे खड्डे खणून ते चांगली माती आणि दीड ते दोन घमेली **चांगले कुजलेले शेणखत** आणि अर्धा किलो सिंगल सुपर फॉस्फेट या मिश्रणाने भरून तयार ठेवावेत. **सूचना :** अर्धवट कुजलेले शेणखत वापरल्यास कलमांना वाळवीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असते. |
| **नारळ** | **नवीन लागवड** | • नारळ नवीन लागवडीसाठी निवडलेल्या क्षेत्रातील साफ सफाई करून घ्यावी. एप्रिल - मे महिन्यात ७.५ **x** ७.५ मीटर किंवा ८ **x** ८ मीटर अंतरावर १ **x** १ **x** १ मीटर आकाराचे खड्डे खणून ते चांगली माती आणि १० किलो **चांगले कुजलेले शेणखत** आणि २ किलो सिंगल सुपर फॉस्फेट या मिश्रणाने भरून तयार ठेवावेत.<br>• बाष्पीभवनामध्ये वाढ होत असल्याने, नारळ बागेत ५ ते ६ दिवसांच्या अंतराने पाणी देण्याची व्यवस्था करावी तसेच आळ्यामध्ये ओलावा टिकविण्यासाठी नारळाच्या शेंडया पुराव्यात आणि झावळ्यांचे आच्छादन करावे.<br>• नवीन लागवड केलेल्या नारळाच्या रोपांना काठीचा आधार दयावा तसेच कडक उन्हामुळे पाने करपू नयेत म्हणून पहिली दोन वर्षे रोपांना वरून सावली करावी. |
| **चिकू** | **फुलोरा व फलधारणा** | • बाष्पीभवनामध्ये वाढ होत असल्याने, चिकू बागेत ५ ते ६ दिवसांच्या अंतराने पाणी देण्याची व्यवस्था करावी तसेच आच्छादनाचा |

| | | |
|---|---|---|
| | | वापर करावा.<br>• चिकू नवीन लागवडीसाठी निवडलेल्या क्षेत्रातील साफ सफाई करून घ्यावी. एप्रिल - मे महिन्यात १० **x** १० मीटर अंतरावर १ **x** १ **x** १ मीटर आकाराचे खड्डे खणून ते चांगली माती आणि तीन ते चार घमेली **चांगले कुजलेले शेणखत** आणि २.५ किलो सिंगल सुपर फॉस्फेट या मिश्रणाने भरून तयार ठेवावेत.<br>सूचना : अर्धवट कुजलेले शेणखत वापरल्यास कलमांना वाळवीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असते. |
| **भाजीपाला/ फळबाग रोपवाटिका** | **फुलोरा** | • उन्हाळी भेंडी भाजीपाला पिकावरील पांढऱ्यामाशीच्या नियंत्रणासाठी शेतामध्ये पिवळ्या रंगाची चिकट कार्डे ८ प्रति एकर लावावीत तसेच भेंडीवर शेंडा व फळे पोखरणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास किडग्रस्त फळे नष्ट करावीत व नियंत्रणासाठी सायपरमेथ्रीन २५ टक्के प्रवाही ३ मि .ली. किंवा लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही ६ मि .ली. प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी तसेच पिकास गरजेनुसार पाणी देण्याची व्यवस्था करावी.<br>• बाष्पीभवनामध्ये वाढ होत असल्याने, फळबाग रोपवाटिकेस, नवीन लागवड केलेल्या फळबागा तसेच भाजीपाला पिकास नियमित पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| **दुभती जनावरे/ शेळ्या/ कुकुटपालन** | **-** | • जनावरांच्या शरीराचे तापमान संतुलित राहण्यासाठी जनावरांना ताजे स्वच्छ व थंड पाणी मुबलक प्रमाणात देण्यात यावे तसेच उष्णतेचा दाह कमी करण्यासाठी वैरणीवर १ टक्के गुळपाणी आणि ०.५ टक्के मीठ यांचे स्वतंत्र द्रावण करून शिंपडावे.<br>• तापमानात वाढ संभवत असल्याने उष्णतेपासून संरक्षण करण्यासाठी गोठ्याचे/कुकुटपालन शेडचे छप्पर गवत, भाताचा पेंडा, किंवा नारळाच्या झावळ्या यांनी झाकून त्यावर अतिउन्हाच्यावेळी पाणी पडेल अशी व्यवस्था करावी तसेच वारा वाहत असलेल्या दिशेने गोठयाच्या / शेडच्या बाजूस पाण्यात भिजवलेले बारदान किंवा गोणपाट बांधावे.<br>• उष्णतेपासून जनावरांचे संरक्षण करण्याकरिता दुपारच्या वेळी जनावरांच्या अंगावर थंड पाणी शिंपडावे त्यामुळे शरीराचे तापमान कमी होण्यास मदत होईल. |

**सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून प्रसारित करण्यात आली.**

**अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा**